कपाशी सल्ला

ए. मणिकंदन, डी. ब्लेझ

अतिवृष्टीमुळे कपाशी शेतामध्ये दीर्घकाळ पाणी साचून राहू शकते. या पाण्याचा लवकरात लवकर निचरा करून घ्यावा.

महाराष्ट्रात बहुतांशी कपाशीचे पीक हे काळ्या जमिनीवर घेतले जाते. अशा जमिनीत चिकणमातीचे प्रमाण अधिक असते. अतिपावसाच्या स्थितीमध्ये या जमिनीतून पाण्याचा निचरा लवकर होत नाही. पाणी दीर्घकाळ साचून राहते. परिणामी, पिकाच्या मुळाभोवती हवा खेळती राहत नाही आणि मुळांना अन्नद्रव्ये शोषण्यात अडथळा निर्माण होतो. जास्त काळ अशी परिस्थिती राहिल्यास मुळे कुजण्यास सुरुवात होते. पांढऱ्या मुळांची वाढ थांबते. पर्यायाने झाड हळूहळू सुकू लागते. अशा परिस्थितीसाठी कपाशीचे पीक अत्यंत संवेदनशील असते. अतिवृष्टीमुळे पाणी साचून राहिल्यास पीक कोमेजून मर किंवा मूळकूज रोगास बळी पडू शकते.

सध्या बहुतांश भागात कपाशीचे पीक हे २०-२५ दिवसांचे आहे. मागील दोन दिवसांपासून सतत पाऊस पडत आहे. तसेच हवामान विभागाने महाराष्ट्रात पुढील २४ ते २४ तासांत अतिवृष्टीचाही अंदाज वर्तवला आहे. अशा स्थितीमध्ये जमिनीत पाणी साचून राहण्याची दाट शक्यता आहे. कपाशीची मर आणि मूळकूज होऊ नये, यासाठी पुढील उपाययोजना सुचविण्यात येत आहेत.

- पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी कपाशीच्या शेतात प्रत्येक एक ओळ सोडून लहान चर काढावेत.
- अन्नद्रव्यांचा अपव्यय टाळण्यासाठी शेतात पाणी साचलेले असताना किंवा पाऊस सुरू असताना खतांचा वापर टाळावा.
- मर किंवा मूळकूज रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पाऊस उघडल्यानंतर ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशकाची भुकटी १० ग्रॅम अथवा कार्बेन्डाझिम (५० टक्के डब्ल्यूपी) २ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे आळवणी करावी.
- पाऊस उघडल्यानंतर मर झालेल्या रोपांच्या जागी नांग्या भराव्यात. तसेच जास्तीच्या रोपांची विरळणी करावी.
- पिकाची वाढ पूर्ववत होऊन पात्या लागण होण्यासाठी पीक ४० ते ४५ दिवसांचे झाल्यावर नत्राचा पहिला हप्ता द्यावा.
- त्यासाठी नीमकोटेड युरियाची प्रति हेक्टरी ५० किलो (१ गोणी) वापरावी.

: A.Manikandan@icar.gov.in

(केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर)

Sakal Agroone, 14.7.2022

कापसाच्या 'आयआरएम' प्रकल्पाला केंद्राकडून निधी

केंद्रीय कापूस संशोधन संस्था करणार अंमलबजावणी

विनोद इंगोले : ॲग्रोवन वृत्तसेवा

नागपूर : राज्याचे मुख्य पीक असलेल्या कापसातील गुलाबी बोंडअळीचे नियंत्रण आव्हान ठरले आहे. त्या पार्श्वभूमीवर गेल्या काही वर्षांपासून राबविण्यात येत असलेल्या कीड प्रतिकारक व्यवस्थापन (आयआरएम) या प्रकल्पाला केंद्रीय कृषी मंत्रालयाने यंदाच्या हंगामात राबविण्यासाठी मंजुरी दिली आहे, केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या सूत्रांनी ही माहिती दिली.

गुलाबी बोंडअळीमुळे गेल्या हंगामात ५० टक्के उत्पादकता प्रभावित झाली होती. त्यामुळेच देशात कापसाचा तुटवडा निर्माण होत प्रक्रिया उद्योजकांना वाढीव दाम मोजावे लागले.

पान ४ वर »

कापसाच्या 'आयआरएम' प्रकल्पाला केंद्राकडून निधी

» पान १ वरून

देशभरात इतर कारणांमुळे कमी झालेल्या उत्पादकतेमुळे देखील कापूस दरात तेजी आली होती. त्या पार्श्वभूमीवर गुलाबी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या निधीतून आयआरएम (इनसेक्ट रजीस्टंन्स मॅनेजमेंट) हा प्रकल्प राबविला जात आहे. गेल्या चार वर्षांपासून राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पाच्या माध्यमातून गुलाबी बोंडअळीमुळे होणारे नुकसान ३० टक्क्यांनी कमी झाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्याच कारणामुळे या प्रकल्पाला यंदाच्या हंगामात राबविण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

> कीड प्रतिकारक व्यवस्थापन (आयआरएम) हा प्रकल्प गेल्या चार वर्षांपासून राबविण्यात येत आहे. गुलाबी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी असलेल्या या प्रकल्पाचे सकारात्मक परिणाम समोर आल्याने यावर्षी पुन्हा या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरता केंद्र सरकारने निधी दिला आहे. महाराष्ट्रात यंदा सुमारे ४० लाख हेक्टरवर कापसाची लागवड राहील, असा अंदाज आहे.
>
> - डॉ. वाय. जी. प्रसाद, संचालक, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

चंद्रपूर, वर्धा, अमरावती, नागपूर, यवतमाळ, नदिड, परभणी, जालना, अकोला, बुलडाणा व खानदेशातील काही जिल्ह्यांत या प्रकल्पाची अंमलबजावणी होईल. प्रकल्पात समावेशीत जिल्ह्यातील पाच गावे व त्यातील दहा शेतकऱ्यांच्या शेतावर गुलाबी बोंडअळी नियंत्रणाचे प्रात्यक्षीक दाखविण्यात येणार आहे. या शेतकऱ्यांनी केलेल्या व्यवस्थापनाची माहिती इतरांनी घ्यावी व त्याआधारे आपल्या शेतातील बोंडअळीचे नियंत्रण करावे, असे यात अपेक्षित आहे.

Sakal Agroone, 18 July 2022

कापूस वेचणी यंत्राची चाचणी अंतिम टप्प्यात : डॉ. मोहपात्रा

विनोद इंगोले : ॲग्रोवन वृत्तसेवा

> कापूस वेचणी यंत्र विकसित करण्यात आयसीएआर संस्थांना यश आले आहे. चाचणीअंती येत्या एक ते दोन वर्षांत ते भारतीय बाजारपेठेत उपलब्ध करून देण्यात येईल. या माध्यमातून पिकाचा उत्पादकता खर्च कमी करणे शक्य होईल, असा विश्वास आहे. हंगामात कापूस वेचणीचे काम वेळकाढू व खर्चिक ठरते. त्यावर हा सक्षम पर्याय ठरेल. सोबतच यांत्रिक वेचणीसाठी नवे कापूस वाण व डिफोलीएशनसाठी भारतीय शेतीला पूरक असे रसायन देखील तयार केले जात आहे.
>
> - डॉ. त्रिलोचन मोहपात्रा, संचालक, भारतीय कृषी संशोधन परिषद, दिल्ली

नागपूर : देशात मजुरांच्या उपलब्धतेची समस्या आणि त्यामुळे वाढता उत्पादकता खर्च या पार्श्वभूमीवर कापूस वेचणीसाठी यंत्र विकसित करण्यात आले आहे. खासगी व 'आयसीएआर' (भारतीय कृषी संशोधन परिषद) अंतर्गत संस्थांच्या सहकार्यातून विकसित या यंत्राच्या चाचणी अंतिम टप्प्यात असून १-२ वर्षांत हे यंत्र भारतीय बाजारपेठेत उपलब्ध होईल, असा विश्वास भारतीय कृषी संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. त्रिलोचन मोहपात्रा यांनी व्यक्त केला.

जगात सर्वाधिक १३० लाख हेक्टर इतके कापूस लागवड क्षेत्र भारतात आहे. मात्र देशाची उत्पादकता कमी आणि तुलनेत उत्पादकता खर्च अशी विरोधाभासी स्थिती आहे. रासायनिक फवारण्यांवर मोठ्या प्रमाणावर होणारा खर्च हा चिंतेची बाब ठरतो. सोबतच हंगामात कापूस वेचणीची मजुरी देखील शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर जाते. त्याची दखल घेत भारतीय कृषी संशोधन परिषदेने भारतीय कापूस शेतीला पूरक ठरणारे वेचणी यंत्र विकसित करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. खासगी कंपन्या, संस्था, भोपाल येथील केंद्रीय अभियांत्रिकी संस्था, कांऊसिल फॉर सायंटिफिक ॲण्ड इंडस्ट्रिअल रिसर्च या सर्व संस्थांनी समन्वयातून तसेच स्वतंत्रपणे देखील या सयंत्रावर काम केले आहे. त्या माध्यमातून कापूस वेचणी यंत्र विकसित करण्यात यश आले आहे. त्याची चाचणी सध्या अंतिम टप्प्यात आहे. ज्या काही सुधारणांची गरज राहते. त्या करून पुन्हा अपेक्षीत सुधारणा करून येत्या एक-दोन वर्षात हे सयंत्र उपलब्ध करून देण्यात येईल. वेचणी यंत्राची सहज बाजारपेठेत उपलब्धता व्हावी याकरिता यंत्र-अवजारे निर्माता यांच्याशी सामंजस्य करार केला जाणार आहे.

नवे वाण व रसायनावर काम

बोंड विकसित होण्याच्या कालावधीत समक्रमित (सिंक्रोनायझेशन) होणे गरजेचे राहते. त्याकरिता नवे कापूस वाण विकसित करण्यात आले आहेत. ज्याचा उपयोग यंत्राव्दारे वेचणीत प्रक्रियेत होईल. एकाचवेळी बोंड फुटले नाही तर ही सारी प्रक्रिया प्रभावित होणार आहे. त्यामुळे एकाचवेळी मॅच्युअर (परिपक्व) होणाऱ्या वाणाची याकरीता गरज भासेल. या साऱ्या तांत्रिक बाबी लक्षात घेता तशाप्रकारचे वाण अपेक्षीत होते. असे काही वाण विकसित करण्यात यश आले असले तरी आणखी काही वाण असावे या करिता संशोधनात्मक काम सुरू आहे.

Agroone, 19 July 2022

Hitavada 17/7/2022

ICAR must focus on improving productivity of oilseeds, pulses, cotton: Agri Minister

NEW DELHI, July 16 (PTI)

Narendra Singh Tomar

AGRICULTURE Minister Narendra Singh Tomar on Saturday asked the premium farm research organisation ICAR to focus on improving productivity of various crops like oilseeds and pulses as yields are much below the global average.

While addressing the 94th foundation day of Indian Council of Agricultural Research (ICAR), the Minister said the ICAR has played an important role in making India self-sufficient in foodgrain production and the country is either number one or two in terms of output of most crops.

"ICAR's foundation day should be celebrated as a pledge day. ICAR should take some pledge on this day and make efforts that the same gets achieved over the next one year," Tomar said.

Although a lot of success has been achieved in the last 93 years of ICAR's journey, the Minister said there is a "great challenge" in terms of productivity in front of us, especially in oilseeds, pulses and cotton. "If we compare (our crop yield) with other countries, then we will feel that there is a lot of work to be done," Tomar said. The Minister said the crop productivity issue should be part of the ICAR's pledge.

India imports around 60 per cent of its annual domestic demand of edible oil. The country had imported a record Rs 1.17 lakh crore of edible oils in the 2020-21 oil year ending October. Pulses too are being imported but not in as much quantity.

Tomar asked the ICAR to continue its research work to mitigate the challenge of climate change on agriculture.

He spoke about the need to promote organic as well as natural farming, as excess use of chemicals and fertilisers impacts human health.

Tomar highlighted that the Modi-Government has taken various initiatives and launched several programmes for the growth of the agriculture sector and doubled farmers' income.

He noted that incomes of lakhs of farmers have not only doubled but more than doubled in the last 7-8 years.

The Minister stressed that there is a need to attract young and educated people in the field of agriculture.

The Hitvada, 17 July 2022

SakalAgrowon 18/7/2022

तेलंगणात अतिघन कापूस लागवडीचा पथदर्शी प्रकल्प

पाचशे एकरांवर होणार अंमलबजावणी : कृषी विद्यापीठ आणि कृषी विभाग करणार समन्वय

विनोद इंगोले : अॅग्रोवन वृत्तसेवा

नागपूर : एकरी झाडांची संख्या वाढवीत त्या माध्यमातून कापूस उत्पादकता वाढीच्या प्रकल्पाची अंमलबजावणी यंदाच्या हंगामात तेलंगणाच्या आदिलाबाद जिल्ह्यात केली जाणार आहे. अतिघन लागवडीचा हा प्रयोग सुमारे ५०० एकरावर केला जाणार असून त्यातील १५० एकरावरील लागवड झाली आहे.

सामान्य लागवड पद्धतीत एकरी झाडांची संख्या ८ हजारच्या घरात राहते. अतिघन लागवड पद्धतीत एकरी झाडांची संख्या २५ हजारांपेक्षा अधिक राहते. पिकवाढरोधकांचा वापर करून त्याआधारे पिकांची वाढ नियंत्रित ठेवली जाणार आहे. त्यासोबतच या प्रकल्पात एकदाच वेचणी होईल, अशाप्रकारच्या कापूस वाणांची निवड करण्यात आली आहे. त्यासोबतच पुढील टप्प्यात कच्च्या कापसावर प्रक्रिया करण्याचेदेखील नियोजन असल्याची माहिती या प्रकल्पात समावेशीत एका अधिकाऱ्याने दिली. काळ्या भारी जमिनीवेजी कापसाला पोषक अशा जमिनींची निवड या प्रकल्पाकरिता केली गेली आहे. या मागे कमीतकमी रासायनिक घटक आणि निविष्ठांचा वापर व्हावा असा उद्देश आहे. कापूस उत्पादकवृद्धात सध्या मजुरांच्या उपलब्धतेची मोठी अडचण आहे. त्यांची ही अडचण दूर करण्यात हा प्रकल्प महत्त्वाकांक्षी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. एका शास्त्रज्ञाने दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकल्प उत्पादकता वाढीत जादूच्या कांडीसारखी भूमिका बजावणार नाही. त्याकरिता आवश्यक त्या वेळी पीकवाढरोधकांचा वापर करण्याची गरज राहील. त्याचा वेळीच वापर व्हावा याकरिता कृषी विभागाच्या पथकाने सजग राहणे व व्यवस्थापनाविषयी शेतकऱ्यांमध्ये जागरूकता वाढविण्याची आवश्यकता राहणार आहे.

> अतिसघन लागवड पद्धतीत बियाणे दर वाढणार आहे. त्यामुळे आपसूकच उत्पादकता खर्चात वाढ होईल. देशाच्या एकंदरीत बीजोत्पादनाचा विचार करता संकरित पद्धतीचे इतके कापूस बियाणे उत्पादन शक्यच नसल्याचे तज्ज्ञ खासगीत सांगतात. मजुरांची उपलब्धता हादेखील बीजोत्पादनातील अडसर आहे. परंतु त्यानंतरही देशात कधी बीटी कापूस बियाण्यांचा तुटवडा निर्माण झाला नाही. त्यावरूनच या क्षेत्रातील कंपन्यांची बनवाबनवी लक्षात येते. प्रगत आणि तंत्रज्ञानात पुढारलेल्या अमेरिकेत सरळ वाणांचा वापर होतो. परंतु कृषी प्रधान म्हणविणाऱ्या भारतात मात्र शेतकऱ्यांऐवजी कंपन्यांचे हित जपले जात संकरित बियाण्यांना मान्यता दिली जाते. पूर्वी एकरी पाच किलो सरकी पेरली जात होती. आता शेतकऱ्यांना कंपन्यांचे गुलाम करण्यात आले आहे यातून शेतकरी आत्मनिर्भर कसा होईल? त्यामुळे अतिसघन पद्धतीत सरळ वाणांचा उपयोग झाला तरच ते फायदेशीर ठरणार आहे अन्यथा नाही.
>
> – विजय जावंधिया, शेतीप्रश्नाचे ज्येष्ठ अभ्यासक

केंद्रीय कापूस संस्थेने आठ-दहा वर्षांपूर्वीचा यावर काम केले आहे. यातून दुप्पट तिप्पट उत्पन्न शक्य आहे. शाखीय वाढ तसेच सरळ वाढणाऱ्या वाणाची अतिसघन लागवडीत गरज राहते. आयसीएआरच्या कोइमतूर येथील केंद्राने अशा प्रकारचे वाण विकसित केले आहे. या वाणाच्या लागवडीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

– त्रिलोचन मोहपात्रा, महासंचालक, भारतीय कृषी संशोधन परिषद, दिल्ली

Sakal Agroone, 18/7/2022

Times of India 18/7/2022

Farmer income up 2X for some crops since FY18

TIMES NEWS NETWORK

New Delhi: Farmer income doubled in fiscal 2021-22 as compared to FY18 for certain crops in some states. In all other cases, it rose in the range of 1.3-1.7 times, a study conducted by SBI has shown.

The study said that the increase in farmers' incomes, engaged in cash crops, has been more prominent compared to those growing non-cash crops. Allied/non-farm income showed a significant increase of 1.4-1.8 times in the majority of states in tandem with farm income during the same period. This substantiates the trend according to the 77th National Sample Survey that source of farmer income has become increasingly diverse apart from crops, the SBI report said.

The study is based on primary data of SBI agri portfolio across states. It contains granular data of various crops from agri-intensive branches, and analyses the change in incomes of farmers over the last five years.

"Minimum support price (MSP), increasingly aligned with market-linked pricing and increasing by 1.5-2.3 times since 2014, has been pivotal in ensuring passage of better prices to farmers and has led to optimal price discovery, setting 'floor price benchmark' for multiple crop varieties (23 as on date), also encouraging farmers to gradually move over to crop varieties that have better yield/value," according to the report.

"The farm sector is currently in the throes of a significant structural shift on the back of a plethora of government policies and has emerged as the known unknown of the India growth story. From a manifold and a statistically significant jump in income (both farm and non-farm, that has even doubled in some cases) to imbibing an entrepreneurial spirit, to a jump in agri exports, the farm sector has been witness to tectonic shifts of late," said Soumya Kanti Ghosh, group chief economic adviser at SBI.

The report said that despite much hype and political patronage, farm loan waivers by states have failed to bring respite to intended subjects, sabotaging credit discipline in select geographies and making banks financially wary of further lending. Since 2014, out of about 3.7 crore eligible farmers, only around 50% of farmers received the amount of loan waiver (till March 2022). Though in some of the states more than 90% of farmers received the debt waiver amount, according to the report.

It said that the aspirational districts programme has been a huge success in just a period of 4 years at least in respect of self-help group (SHG) financing. Of the total SHG financing in the country, 18% outstanding belongs to these 124 aspirational districts with a share in excess of 30% in select districts, the report said.

'Aspirational Districts Scheme' A Success: Study

State	Crop	Farmers' avg income (FY18) in ₹lakh	Farmers' avg income (FY22) in ₹lakh	Times increased
Rajasthan	Wheat	1.97	2.47	1.3x
Gujarat	Cotton	8.08	13.37	1.7x
	Groundnut	3.11	4.74	1.5x
Maha	Soyabean	1.89	3.80	2.0x
	Sugarcane	2.79	3.89	1.4x
K'taka	Cotton	2.67	5.63	2.1x
	Paddy	2.26	2.95	1.3x

Source: SBI Research

Times of India, 18 July 2022

कृषी उद्योजकता सर्व समस्यांवर उपाय ठरेल

डॉ. वाय. जी. प्रसाद यांचे प्रतिपादन

नागपूर, २० जुलै

ग्रामीण भागात आर्थिक सुबत्ता आणायची असेल तर कृषी उद्योजकतेला प्राधान्य द्यावे लागेल. सर्व समस्यांवर कृषी उद्योजकता हाच सर्वोत्तम असा उपाय ठरेल असे प्रतिपादन आयसीएआर - सीआयसीआरचे संचालक डॉ. वाय.जी.प्रसाद यांनी केले. बुधवार २० जुलै २०२२ रोजी आर्या प्रकल्पाच्या अनुषंगाने बचत गटातील महिलांना मशीन वाटप सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुनील रोकडे, डॉ. विनिता गोतमारे, डॉ. राघवेंद्र, डॉ. वेलमुरुगेन, गोस्वामी, डॉ. दीपा लाल, डॉ. एस.एस.पाटील, डॉ. पु.व्ही. गलकाटे, सुनीता चौहान, डॉ. पी.बी.देऊळकर, डॉ. सुनील वानखेडे, गायकवाड, जयश्री खोब्रागडे, कावळे, सौरभ पाटील उपस्थित होते.

स्वयंसहायता बचतगटांना आर्या प्रकल्पाच्या अनुषंगाने यंत्र वाटप करताना डॉ. प्रसाद, डॉ. सुनील रोकडे, जयश्री खोब्रागडे व इतर मान्यवर

आर्या प्रकल्प सन २०१६ पासून सुरू आहे. यामाध्यमाने गरीब जनतेचे जीवनमान सुधारण्यास बराच वाव आहे. छोट्या कृषी उद्योगातून मानवी संसाधने आणि गरीब जनतेचे जीवनमान सुधारण्यास आणि त्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यास अधिक वाव आहे. याचवेळी महिलांनीही पदार्थ तयार करून ते विकण्यावर भर द्यावा. त्यांनाही यातून नेमका किती लाभ झाला याचा लेखाजोखा त्यांनी आम्हाला द्यावा, असे आवाहन डॉ. वाय.जी.प्रसाद यांनी केले., ग्रामीण भागात फळ आणि भाजीपाला प्रक्रिया करणाऱ्या गटांना कृषी उद्योग उभारावा याकरिता सन २०१६ पासून आर्या प्रकल्प राबविला जात आहे. त्यानुसार बचत गटांना मशीन दिली जाते. त्याद्वारे उद्योग उभारून त्यातून नेमका किती लाभ झाला याचा लेखाजोखा त्यांनी आत्मनिर्भर व्हावे असाही त्यामागचा उद्देश असल्याची भूमिका डॉ. वाय.जी.प्रसाद यांनी मांडली.

(तभा वृत्तसेवा)

खेड्यांतील स्थलांतरण थांबवणे गरजेचे

खेड्यात नोकरी मिळत नाही म्हणून बहुतांश मंडळी शहरात स्थलांतर करतात. आज या स्थलांतरामुळे खेडे भकास झाले आहेत. हा प्रकार असाच सुरू राहिला तर शहरे फुगतील. परिणामी नागरी सुविधांचा प्रश्न उद्भवेल. हा प्रकार टाळण्यचा असेल तर ग्रामीण भागातच सर्वोत्तम असा रोजगार मिळावा, अशी तज्ज्ञांची कारवीच लागेल. आर्या हा प्रकल्प त्याचे उत्तर असून, ग्रामीण युवकांनी याचा लाभ घेत आपले आयुष्य घडवावे, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुनील रोकडे यांनी केले. कृषीवर आधारित उद्योग उभारता तर गावातच पैसा उभा होईल. यातून अनेकांना रोजगार मिळेल अन् पर्यायाने स्थलांतर थांबेल अशीही डॉ. सुनील रोकडे यांनी स्पष्ट केले.

Tarun Bharat, 21.7.22

'Need to empower rural youth through skill devp'

LOKMAT NEWS NETWORK
NAGPUR, JULY 21

Director of ICAR-CICR, Nagpur, Dr Y G Prasad and others during a programme held recently.

There is need to empower rural youth through skill development and championing the vocal for local approach for processing and value addition of agro products. Development and progress of these groups will be monitored and will be highlighted to serve as replicable models for other rural youth, said director of ICAR-CICR, Nagpur, Dr Y G Prasad.

He was speaking during a programme organised by the Krishi Vigyan Kendra, ICAR-CICR, Nagpur. Processing equipments viz. two gravy machines, two potato slicer machines and two citrus juicer machines were distributed to the rural women of six self-help groups so that they can start their own enterprises of processing fruits and vegetables and sell the value added products to enhance their income under 'Attracting Rural Youth in Agriculture Project of ICAR'.

Dr Sunil Rokde, PS, ICAR-CICR, Nagpur and Head KVK, urged the SHGs to keep up to date records and to give feedback regarding the income earned through the sale of value added agro-products.

Principal scientist Dr Vinita Gotmare, Dr Raghvendra, Dr Velmourgane, chief administration officer Goswami, the subject matter Specialists Dr U V Galkate, Sunita Chauhan, Dr P B Deulkar, Dr Mayur Meshram, Saurabh Patil, Dr Sachin Wankhede, Prashant Gayakwad and Kawle were present. SMS Horticulture, (PI-ARYA) Dr Deepa Lal and Jayashree Khobragade organised this programme.

Lokmat Times, 22 July, 2022

'कपाशी'साठी विशेष समिती

दहा सदस्य समिती देणार देशभरात सुधारित तंत्रज्ञानाचे धडे

ॲग्रोवन वृत्तसेवा

नागपूर : लागवड क्षेत्राच्या बाबतीत जगात पहिल्या क्रमांकावर असणार आपला देश उत्पादकतेच्या बाबतीत मात्र पिछाडीवर आहे. उत्पादित कापसाचा दर्जा देखील नाही. त्या पार्श्वभूमीवर उत्पादकता वाढ आणि गुणवत्ता सुधार या बाबींना प्राधान्य देत विशेष समितीचे स्थापना करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

कापसाची गुणवत्ता आणि उत्पादकता या विषयावरील एका विशेष बैठकीचे आयोजन रविवारी (ता. २४) दिल्ली येथे करण्यात आले होते. केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्र सिंह तोमर, वाणिज्य तसेच वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल,

पान ४ वर »

> कापसाची अतिसघन पद्धतीने लागवड करून एकरी जणांची संख्या वाढली पाहिजे. मी गेल्या सात वर्षांपासून साडेपाच लाख रुपयांचे संयंत्र खरेदी करून या पद्धतीने लागवड करीत आहे. पारंपरिक पद्धतीत एकरी दहा हजार झाडे बसतात. मात्र सघन लागवड पद्धतीत दोन ओळीत ९० सेंटीमीटर तर दोन झाडांत पंधरा सेंटीमीटर अंतर ठेवल्यास २९ हजार झाडे बसतात. ४००० झाडे बाद ठरली तरी २५००० झाडे राहतात. प्रति बोंड चार ग्रॅम कापूस त्यानुसार एकरी १५ क्विंटलची उत्पादकता मिळते. मला जास्तीत जास्त अठरा क्विंटल पर्यंत उत्पादकता मिळाली आहे.
>
> – दिलीप ठाकरे, प्रयोगशील शेतकरी

» पान १ वरून

वस्त्रोद्योग राज्यमंत्री दर्शना जरदोश, केंद्रीय कृषी मंत्रालयाचे सचिव, केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरचे संचालक डॉ. वाय. जी. प्रसाद, कापूस प्रक्रिया उद्योग क्षेत्रातील व्यावसायिक, तज्ज्ञ यांची या बैठकीला उपस्थिती होती.

महाराष्ट्रातून दिलीप गुलाबराव ठाकरे तसेच रविकिरण पाटील, राजस्थानमधील एक याप्रमाणे शेतकरी प्रतिनिधी या बैठकीला निमंत्रित होते. भारताचे कापूस लागवड क्षेत्र १३० लाख हेक्टर आहे. इतर कापूस उत्पादक देशाच्या तुलनेत ते सर्वाधिक असले तरी कापसाची प्रतिहेक्टरी उत्पादकता मात्र इतर कापूस उत्पादक देशाच्या तुलनेत अत्यल्प आहे. त्यासोबतच प्रक्रिया होणाऱ्या कापसाचा दर्जा नसल्याने इतर अनेक देशांमधून भारतीय कापसाला मागणी राहत नाही. हे चित्र बदलण्यासाठी काय केले पाहिजे या मुद्द्यांवर बैठकीत चर्चा झाली. यावेळी प्रक्रिया उद्योजकांनी देशात जागतिक पातळी उपलब्ध असलेले तंत्रज्ञान कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिले पाहिजे, अशी मागणी जोरकसपणे लावून धरली.

> प्रक्रिया उद्योजक, तज्ज्ञ शेतकरी, शास्त्रज्ञ यांचा समावेश असलेल्या समितीची स्थापना करण्यासंदर्भात केंद्र सरकार सकारात्मक आहे. लवकरच ही समिती अस्तित्वात येत देशात कापसाची उत्पादकता आणि दर्जा सुधारण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे.
>
> – डॉ. वाय. जी. प्रसाद, संचालक, केंद्रीय कापूस संशोधन संस्था.

यांत्रिकीकरणाच्या मुद्द्यावर चर्चा

कापूस शेतीचे यांत्रिकीकरण झाले पाहिजे हा मुद्दा बैठकीत चर्चेला आला. कारण सध्या मजुराद्वारे कापसाची वेचणी होते. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर प्लॅस्टिक पाऊच, तंबाखूच्या पुड्या, केस अशा प्रकारचा कचरा येतो. तब्बल १२ प्रकारचा कचरा प्रक्रिया उद्योजकांना वेगळा करावा लागतो. त्याकरता वेगळी यंत्रणा उभारावी लागते. परिणामी कापूस शेतीचे यांत्रिकीकरण झाल्यास पहिल्या टप्प्यातच कचरा वेगळा करता येणार आहे. त्यामुळे कापसाची गुणवत्ता सुधारेल.

Sakal Agroone, 26 July 2022

www.tarunbharat.net तरुण भारत
26.7.2022

कापूस उत्पादकतेत जागतिक सर्वोत्तम मानकांचा अंगीकार करण्याची हीच वेळ

पीयूष गोयल यांची भूमिका

◆ नवी दिल्ली, २५ जुलै

भारताने कापूस उत्पादकतेत जागतिक सर्वोत्तम मानकांचा अंगीकार करण्याची वेळ आली आहे, असे प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य, उद्योग, वस्त्रोद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी केले.

सूती कापड मूल्य साखळीचा भाग असलेल्या हितधारकांची नवी दिल्लीतील वाणिज्य भवन येथे बैठक झाली. कापूस उत्पादकता वाढविणे आणि भारतीय कापसाचे ब्रँडिंग यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली, त्यात ते बोलत होते. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री नरेंद्रसिंग तोमर आणि केंद्रीय वस्त्रोद्योग राज्यमंत्री दर्शना जरदोश यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी कापूस उत्पादकतेला चालना देण्याची गरज असून त्यासाठी सर्व संबंधित हितधारकांनी उत्तम पद्धतींची परस्परांमध्ये देवाणघेवाण केली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. उत्पादकतेतील संशोधन, शेतकऱ्यांना शिक्षण आणि ब्रँडिंग यासाठी खाजगी क्षेत्राने योगदान दिले पाहिजे. त्यासाठी सरकार पूरक साह्य करेलच, असे मत पीयूष गोयल यांनी व्यक्त केले. एकात्मिक दृष्टिकोनावर त्यांनी भर दिला. कापूस मूल्य साखळी अधिक मजबूत करण्यासाठी खाजगी क्षेत्राने मिशन मोडवर काम केले पाहिजे. आपल्याकडे तयार झालेल्या चांगल्या प्रतीच्या आपल्या कापसाला आपणच उद्योगांच्या समान योगदानाद्वारे प्रोत्साहन दिले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. कृषी आणि वस्त्रोद्योग क्षेत्रातील सेतूप्रमाणे कापूस काम करतो. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कापसावर आधारित उत्पादनांचा एकूण वस्त्रोद्योग आणि परिधान उत्पादनांमध्ये लक्षणीय वाटा आहे. मुक्त व्यापार करारांद्वारे बाजारपेठेत शिरकाव करता आल्यामुळे, उत्पादकता आणि गुणवत्ता दोन्ही वाढविण्यासाठी एकत्रित कृती अत्यावश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

जागतिक कापूस उद्योगात आपले वर्चस्व परत आणण्याची गरज आहे आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यासाठी भारतीय वस्त्रोद्योग हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, असे गोयल यांनी सांगितले.

केंद्र सरकार पंतप्रधानांच्या 'फार्म टू फायबर; फायबर ते कारखाना; फॅक्टरी ते फॅशन; फॅशन टू फॉरेन या ५-एफ व्हिजनवर काम करत आहे. योग्य बियाणांबाबत कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करून आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रगतिशील कृषी पद्धतींचा अवलंब करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन उत्पादन आणि नफ्याचे प्रमाण वाढवणे अत्यावश्यक आहे, असे गोयल म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

Textiles sector to work on raising cotton output

Production estimated at 315 lakh bales

SPECIAL CORRESPONDENT
COIMBATORE

The textile industry will soon submit to the government a proposal to improve cotton quality and productivity.

Union Textiles Minister Piyush Goyal and and Union Agriculture Minister Narendra Singh Tomar held a meeting with cotton sector stakeholders on July 24.

Ravi Sam, chairman of Southern India Mills' Association (SIMA), who participated in the meeting, said a multi-pronged approach is required for farmers to sow quality seeds and adopt best practices, to improve soil health and reduce contamination in cotton.

The industry will submit a proposal to the government, start engaging with the farmers, and also extend support to them to increase productivity and improve quality. "The aim is to start working with farmers for the winter sowing," he said.

A press release from SIMA, Confederation of Indian Textile Industry and The Cotton Textiles Export Promotion Council said annual cotton production in the country is estimated to drop to the 'lowest' level of 315 lakh bales this season.

The Hindu, 27.7.2022



Produced and published by
Dr. Y. G. Prasad, Director, ICAR-CICR, Nagpur

Chief Editor:
Dr. Y. G. Prasad

Senior Editor:
Dr. Annie Sheeba

Associate Editor, Cover page & Layout Design:
Dr. M. Sabesh

Editors: Dr. V. Chinna Babu Naik, Dr. Pooja Verma, Dr. K. Baghyalakshmi, Dr. Debashis Paul

Publication Note: Cotton Innovate is an Open Access monthly newsletter of ICAR-CICR, Nagpur available online at http://www.cicr.org.in/cotton_innovate.html

Published by

Director ICAR-Central Institute for Cotton Research Post Bag No. 2, Shankar Nagar PO, Nagpur 440010, India
Phone: 07103-275536; Fax: 07103-275529
Email: cicrnagpur@gmail.com, director.cicr@icar.gov.in

Citation: Cotton Innovate 2022, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur, India, Volume: 07 (02), pp-15, available at http://www.cicr.org.in/cotton_innovate.htm

To subscribe for receiving an electronic copy of this newsletter, please write a request mail to cicrinnovate@gmail.com

ICAR-CICR
ICAR - Central Institute for Cotton Research
(An ISO 9000 : 2015 Certified Organisation)